देवतांची उपासना : श्री गणपति - खंड ४

# श्री गणेश पूजाविधी

## (काही मंत्रांच्या अर्थासह)

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे**
**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**आणि श्री. दामोदर विष्णु वझेगुरुजी**

(संचालक, सनातन पुरोहित पाठशाळा)



**सनातन संस्था**

**प्रस्तुत पुनर्मुद्रणाच्या २,००० प्रती आणि**
**या लघुग्रंथाच्या आतापर्यंत १,१३,५९० प्रती प्रकाशित !**

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्माच्या प्रसारासाठी 'सनातन संस्थे'ची स्थापना !

२. 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाचे जनक !

३. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

४. ग्रंथ-निर्मिती : जून २०२४ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९७ लाख १० सहस्र प्रती !

५. शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

६. 'सनातन प्रभात' नियतकालिकांचे संस्थापक-संपादक !

७. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी हिंदुत्वनिष्ठांना दिशादर्शन !

८. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ 'भारत गौरव पुरस्कार' देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

(संपूर्ण परिचयासाठी वाचा - '**www.Sanatan.org**'.)

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥

– जयंत बाळाजी आठवले
१८.५.१९९६

---

# परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’ वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले तरी, त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधकांनी लिहून दिलेल्या लिखाणात ‘प.पू.’ किंवा ‘परात्पर गुरु’ अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

# अनुक्रमणिका

(प्रकरणांतील काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


**प्रकरण १. पूजेची सिद्धता (तयारी) ९**

**प्रकरण २. पूजेच्या संदर्भातील काही सूचना १५**

**प्रकरण ३. प्रत्यक्ष पूजाविधी १७**

३ उ. देशकाल अन् संकल्प २४

३ ऊ. श्री महागणपतिपूजन ३ ए. श्रीविष्णुस्मरण २९

३ ओ. पूजासाहित्य आणि पूजास्थळ यांची, तसेच स्वतःची (पूजकाची) शुद्धी ३६

३ औ. श्री सिद्धिविनायकाच्या पार्थिव मूर्तीची पूजा ३७

**प्रकरण ४. श्री सिद्धिविनायकाच्या मूर्तीची उत्तरपूजा ६३**

**卐 श्री गणपतीची आरती (अर्थासह) ६७**

**卐 प्रस्तुत लघुग्रंथाचे अध्यात्मशास्त्रीय परिभाषेतील सार ! ७०**

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन ७२**

## मनोगत

कोणत्याही देवतेच्या पूजेत देवतेचे आवाहन, स्थापना आणि प्रत्यक्ष पूजाविधी, या गोष्टी अंतर्भूत असतात. यासाठी देवतेला उपचार समर्पित करतांना त्या वेळी करायच्या कृती आणि म्हणायचे मंत्र यांचा अर्थ पूजकाला ज्ञात असल्यास त्याच्याकडून पूजाकर्म अधिक भावपूर्ण होते. त्यामुळे देवतेचे तत्त्व मूर्तीत अधिक प्रमाणात आकृष्ट होऊन पूजकांना (पूजा करणारा अन् त्याचे कुटुंबीय यांना) त्याचा लाभ होतो, म्हणजे पूजकावर त्या देवतेची कृपा होते. याच उद्देशाने श्री गणेशचतुर्थीच्या वेळची पूजा, पूजेतील विधी आणि काही मंत्र अर्थासह या लघुग्रंथात दिले आहेत.

पूजेतील मंत्र हे वेदोक्त आणि पुराणोक्त असे दोन प्रकारचे असतात. स्वरयुक्त वेदोक्त मंत्र उच्चारण्यासाठी त्यांचे विधिवत् अध्ययन करणे आवश्यक असते. आजकाल बहुतांश भाविकांना असे अध्ययन करणे विविध कारणांमुळे शक्य नसते. याउलट पुराणोक्त मंत्र म्हणण्यास सुलभ असून या मंत्रांना वेदोक्त मंत्रांप्रमाणे कडक नियम नाहीत. यासाठी या

लघुग्रंथामध्ये आम्ही पुराणोक्त मंत्र दिले आहेत. वेदोक्त मंत्र न जाणणाऱ्यांनी पुराणोक्त मंत्रांनी पूजा करावी, जेणेकरून अयोग्य प्रकारे वेदमंत्र उच्चारल्याने होणारी हानी टाळता येईल. वेदोक्त मंत्र कळण्यासाठी काही ठिकाणी त्यांचा उल्लेख करून त्याखाली तशी टीपही दिली आहे.

पूजेत 'भाव तेथे देव' हे तत्त्व महत्त्वाचे आहे. देवतेची पूजा करतांना अंतःकरणात भाव नसेल, तर पूजेचा तेवढा लाभ होणार नाही. म्हणून श्री गणेशाची पूजा करतांना 'प्रत्यक्ष श्री गणेश पूजास्थळी आला आहे', या भावानेच सर्व उपचार करावेत.

लघुग्रंथात दिल्याप्रमाणे श्री गणेशाचे शास्त्रोक्त पद्धतीने पूजन करून पूजकाला अधिकाधिक गणेशतत्त्वाचा लाभ होवो, ही गुरुचरणी प्रार्थना. - **संकलक**

**टीप** लघुग्रंथाच्या शेवटी इंग्रजी अक्षरांत दिलेला संकेतांक हा केवळ कार्यालयीन सोयीसाठी आहे. त्याचा लिखाणाशी संबंध नाही.

वाचा : सनातनचा लघुग्रंथ **देवीपूजनाचे शास्त्र**